# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळ


---

### विश्वासघात करणाऱ्या आरोपीतांना कोंढाळी पोलीसांनी केले अटक

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे तक्रारदार नामे सतिश कैलास भोपे वय २८ वर्ष व्य. ट्रकमालक रा. बिलखेडा ता. धरणगाव जि. जळगाव यांनी दिनांक २३/०८/२०२४ रोजी तक्रार दिली की त्यांची आयशर गाडी क्रमांक एम एच १८ बि जी ९६२१ हीचेवर एक महीन्यापासुन इसम नामे जुनेद आबीद शेख वय २४ वर्षे रा. नगरदेवळा ता. चाळीसगाव जि. जळगाव याला चालक म्हणुन कामावर ठेवले होते दिनांक ३०/०७/२०२४ रोजी हरीओम लॉजेस्टिक वाडी यांचे ऑर्डर मिळाल्याने माझे सांगणेवरुन चालक जुनेद याने हरीओम लॉजिस्टीक वाडी येथुन परच्युट माल आयशर मध्ये लोड करुन रात्री ०८:०० वा. चे सु. जळगाव येथे जाणेकरीता नागपुर अमरावती मार्गाने निघाला असता चालक याने मालकाला फोन करुन सांगीतले की गाडीची अचानक वायरींग जळाल्याने गाडी कोंढाळी जवळील चाकडोह गावाजवळ ना दुरुस्त झालेली आहे. दिनांक ०८/०८/२०२४ रोजी पासुन सदर चालकाचा संपर्क न झाल्याने सदर वाहन मालकाने सदर ठिकाणी येउन वाहन व वाहन चालकाचा शोध घेतला असता मिळुन आले नाही त्यावरुन तक्रारदार यांची खात्री पटली की त्यांची आयशर गाडी क्रमांक एम एच १८ बि जी ९६२१ ही सदर गाडीवरील चालक जुनेद आबीद शेख याने लबाडीने त्यांचा विश्वासघात करुन कोठेतरी घेउन गेला आहे व गहाळ केली आहे. अशा तक्रारीवरुन **अपराध क्रमांक ६२१/२०२४ कलम ३१६ (२), ३१६ (४) भारतीय न्याय संहीता** अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला आहे.

पोलीस स्टेशन कोंढाळी हे नागपुर ते अमरावती राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील अतीसंवेदनशील पोलीस स्टेशन असुन, महामार्गावरील सदर घटनेच्या तपास अनुषंगाने तात्काळ विशेष पथक स्थापन करण्यात आले. त्यानुसार पथकामार्फत पोस्टे कोंढाळी हददीतील अशा प्रकारचे गुन्हे करणारे संशयीत गुन्हेगारांच्या हालचालीवर बारकाइने लक्ष ठेवण्यात आले होते तसेच याबाबत गोपणीय बातमीदार नेमण्यात आले. दि. २६/०८/२०२४ रोजी मिळालेल्या गोपणीय माहीतीनुसार, पथकामार्फत तपासादरम्यान **आरोपी नामे १) खालीद हारुण राठोड वय २८ वर्षे रा. गुलमोहर नगर, भरतवाडा रोड, नागपुर २) मोहम्मद नसीर अब्दुल अजीज वय ३९ वर्षे रा. कडबी चौक, ऑरेंज नगर, नागपुर ३) अताउल रहमान अजीज उल रहमान वय ४२ वर्ष रा. हंसापुरी खदान, नागपुर** यांना दि. २७/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांचेकडुन आयशर गाडी क्रमांक एम एच १८ बि जी ९६२१ वाहनाचे वेगवेगळे केलेले भाग १) आयशर वाहनाचे कॅबीन २) आयशर वाहनाचे बॉडी २) आयशर वाहनाचे डी इ एफ २७ लिटर क्षमतेची टॅक ३) टोव्हींग व्हॅन क्रमांक एम एच २७ डी एल ५४१८ ४) आयशर वाहनाचे चेसीस ( टायर, इंजीन व इतर साहीत्य समाविष्ट असलेले ) हस्तगत करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु असुन उर्वरीत आरोपी अटक करणे बाकी आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग काटोल श्री बापु रोहोम सर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कोंढाळीचे ठाणेदार श्री राजकुमार रा. त्रिपाठी यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक धवल

देशमुख, पोहवा अब्दुल राजीक, नितेश राठोड, पोना मनोज आगरकर, पोकॉ अमित पवार, चालक पोहवा पंकज चिव्हाणे यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर